१९०८ साली महात्मा गांधी यांची हत्या झाली.

भारतातील मुस्लीम राजकारण

## इ. स. १९२८ पूर्वीचे मुस्लीम राजकारण

एखाद्या जमातीच्या, संप्रदायाच्या किंवा धर्माच्या अनुयायांचे राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हितसंबंध समान आहेत असे मानणे म्हणजे संप्रदायवाद (कम्युनॅलिझम) होय. इतर धार्मिक गटांपासून, संप्रदायांपासून हा गट स्वत:ला वेगळा मानतो आणि आपले वेगळेपण जपतो. राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात मिसळून न जाता, तो आपल्या धार्मिक गटाचे आर्थिक, राजकीय इत्यादी हितसंबंध जपत राहतो हे संप्रदायावादाचे लक्षण आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासात भारताची फाळणी आणि पाकिस्तानची निर्मिती ही मुस्लीम जमातवाद किंवा संप्रदायवादापासून घडून आली असे मानले जाते. अर्थातच पाकिस्तानच्या निर्मितीला मुस्लीम संप्रदायवादाला असलेला ब्रिटिश साम्राज्यवादाचा पाठिंबा तितकाच महत्त्वपूर्ण होता.

भारतात मुस्लिमांची आक्रमणे आठव्या शतकापासून सुरू झाली. मुहम्मद बिन कासिम, मुहम्मद गझनी, मुहम्मद घोरी यांच्या भारतावरील आक्रमणानंतर तेराव्या शतकात दिल्लीत मुस्लीम सत्ता प्रस्थापित झाली. मात्र भारतात मुस्लीम सत्तेचा खरा विस्तार सोळाव्या शतकापासून मोगल घराण्याकडून केला गेला. या घराण्यातील औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (१७०७) मोगल घराण्याला उतरती कळा लागली. त्यानंतर मराठे प्रभावी बनले. भारतात आलेल्या ब्रिटिशांना इथे सत्ता स्थापन करण्यासाठी मराठ्यांशी बराच संघर्ष करावा लागला; कारण ती भारतातील प्रमुख सत्ता होती. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी सर्व भारत ब्रिटिशांच्या ताब्यात होता. त्यांच्या सत्तेला पहिले आव्हान १८५७ च्या उठावाच्या रूपाने भारतीयांकडून दिले गेले. यात हिंदू व मुस्लीम संस्थानिक आणि त्यांची प्रजा सामील होती. ब्रिटिशांनी हा उठाव मोडून काढला. यात हिंदूबरोबरच मुस्लिमांनाही ब्रिटिश सत्तेचे आघात सहन करावे लागले. मुस्लीम सरंजामदार, जहागीरदार, जमीनदार यांना त्यांच्या जमिनी, जहागिरी व इतर हक्कांपासून वंचित व्हावे लागले. मुस्लिमांची सर्व बलस्थाने ब्रिटिशांनी हिसकावून घेतली. याचा परिणाम मुस्लिमांवर होऊन ते ब्रिटिशविरोधी बनले. इंग्रजी भाषा, शिक्षण, संस्कृती यांचा मुस्लिमांनी विरोध केला.

**वहाबी आंदोलन**

मुस्लिमांच्या ब्रिटिश विरोधातूनच या चळवळीचा जन्म झाला. या चळवळीची प्रेरणा मुस्लिमांनी शाह वलिउल्लाह यांच्याकडून घेतली होती. ही एक मुस्लीम धर्माधिष्ठित, पुनरुज्जीवनवादी व सशस्त्र चळवळ होती.

प्रारंभी ब्रिटिशांविरुद्ध आणि नंतर शिखांविरुद्ध धर्मयुद्ध या चळवळीने घोषित केले. भारतात मुस्लीम सत्तेची पुनर्स्थापना हे त्यांचे ध्येय होते. इ. स. १८६३ च्या सुमारास प्रदीर्घ संघर्षानंतर ब्रिटिशांना वहाबी चळवळ दडपण्यात यश मिळाले. शाह अब्दुल आझिझ, सईद अहमद बरेलवी, शाह इस्माईल आणि इतर मंडळींनी या चळवळीचे नेतृत्व केले.

## सर सय्यद अहमद आणि अलिगढ चळवळ

सर सय्यद अहमद (१८१७-१८९८) हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुस्लिमांमधील एक प्रभावी नेते राहिले. अलिगढ चळवळीचे ते प्रणेते होते. मुस्लिमांच्या आजवरच्या ब्रिटिश विरोधाला ब्रिटिशांबद्दलच्या निष्ठेत रूपांतरित करण्याची कामगिरी त्यांनी पार पडली. मुस्लीम समाजाला आपली सत्ता गेल्याचे दुःख होते. इंग्रजांच्या आर्थिक धोरणांमुळे व औद्योगिक धोरणांमुळे हिंदू कारागिरांप्रमाणेच मुस्लीम कारागिरांनाही आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागत होते. हिंदूंनी इंग्रजांच्या सत्तास्थापनेनंतर इंग्रजी शिक्षणाकडे पाठ न फिरविता ते आत्मसात केले. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात ब्रिटिशांनी राज्यकारभारात व न्यायालयात पर्शियन भाषेऐवजी इंग्रजी भाषेचा वापर सुरू केला; यामुळे इंग्रजी शिक्षणाकडे पाठ फिरविलेल्या मुस्लिमांना शासकीय नोकऱ्यांत जागा मिळू शकल्या नाहीत. त्याऐवजी इंग्रजी शिक्षणाचा स्वीकार केलेल्या हिंदूंना त्या जागा मिळाल्या. यावरून मुस्लिमांनी इंग्रजी शिक्षणाला विरोध केल्यास त्यांना ब्रिटिशांच्या कारकिर्दीत नोकऱ्या मिळणार नाहीत व त्यांचा विकास होणार नाही याची सर सय्यद अहमद यांना खात्री पटली; तसेच मुस्लीम हे आता राज्यकर्ते उरले नाहीत, तेव्हा राज्यकर्ते असलेल्या ब्रिटिशांची कृपादृष्टी संपादन करून स्वतःचे राजकीय हित आणि प्रगती साधण्याचा प्रयत्न मुस्लिमांनी करणे त्यांच्या हिताचे राहील या निष्कर्षाला सर सय्यद आले. स्वतः ईस्ट इंडिया कंपनीत सेवा करून १८५७ मध्ये सर सय्यद निवृत्त झाले होते. इ. स. १८६९ मध्ये त्यांनी इंग्लंडचा दौरा केला आणि त्यानंतर मुस्लिमांनी ब्रिटिशांना विरोध न करता, त्यांच्याशी संबंध ठेवून स्वतःचा फायदा करून घ्यावा हे त्यांचे मत अधिकच पक्के बनले. इ.स. १८७८ मध्ये ब्रिटिश शासनाने सर सय्यद यांना व्हाइसरॉयच्या कायदेमंडळाचे सदस्य नेमले आणि १८८८ मध्ये त्यांना 'सर' पदवी बहाल केली. सर सय्यद यांचे कार्यक्षेत्र उत्तर भारत हे होते आणि त्यांच्या शैक्षणिक कार्याचे केंद्र अलिगढ हे होते.

सर सय्यद यांनी यानंतर जो कार्यक्रम हाती घेतला, त्यात पुढील बाबींचा समावेश होता– (१) मुस्लिमांचा मागासलेपणा दूर करण्यासाठी त्यांच्यात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करणे. त्यांनी इंग्रजी शिक्षण न घेतल्यास शासकीय आणि इतर क्षेत्रांत ते सदैव हिंदूंच्या मागे राहतील हे मुस्लिमांना पटवून देणे. (२) पारंपरिक शिक्षणाबरोबर विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादींचे शिक्षण घेण्यासाठी मुस्लिमांना तयार करणे. त्यासाठी शिक्षणसंस्था स्थापन करणे आणि इस्लाम धर्म हा इंग्रजी शिक्षण, विज्ञान इत्यादींच्या अभ्यासाच्या विरोधी नाही हे पटवून देणे. (३) ब्रिटिशांना हे पटवून देणे की, भारतीय मुसलमान हे ब्रिटिशांच्या सत्तेच्या विरोधी नाहीत. (४) मुस्लिमांना हे पटवून देणे की, त्यांचे हित ब्रिटिशांच्या सत्तेला पाठिंबा देण्यात आहे. (५) त्याचबरोबर मुस्लिमांनी आपले वेगळेपण आणि हितसंबंध जोपासावेत. मुस्लिमांनी राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहावे. हिंदु-मुस्लीम ऐक्यामागे न जाता मुस्लीम संघटन करावे. या मुद्द्यांच्या आधारावर सर सय्यद अहमद यांनी आपली अलिगढ चळवळ चालविली.

सर सय्यद यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना हे पटवून देण्याचा प्रयत्न केला की, मुस्लीम हे ब्रिटिशांशी एकनिष्ठ आहेत, ते ब्रिटिशांच्या विरोधी नाहीत. याचबरोबर ब्रिटिशांशी संबंध ठेवण्यात मुस्लिमांना त्यांचा धर्म कोणत्याही प्रकारे आड येत नाही असे सर सय्यद यांनी ब्रिटिशांना सांगितले. त्याच वेळी सर सय्यद यांनी मुस्लिमांना हे पटवून देण्याचा प्रयत्न केला की, त्यांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांशी संघर्ष किंवा विरोध न करता, त्यांच्याशी एकनिष्ठ राहून, ब्रिटिशांची मर्जी संपादून स्वतःचा विकास साधावा. ब्रिटिश आणि मुस्लीम यांच्यातील मतभेदांची, दूरत्वाची दरी बुजविण्यात सर सय्यद यशस्वी ठरले. याच सुमारास ब्रिटिश शासनकर्त्यांत एक बदल होत होता. हिंदूंमध्ये या

सुमारास झालेल्या शैक्षणिक प्रसारातून राजकीय जागृती घडून येत होती, त्याचा भविष्यकाळात परिणाम ब्रिटिश विरोधात होण्याची शक्यता होती. अशा वेळी ब्रिटिशांना आपल्या निष्ठा देऊ इच्छिणाऱ्या मुस्लिमांना जवळ करण्याचे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ठरविले.

मुस्लिमांमध्ये इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराच्या हेतूने सर सय्यद अहमद यांनी १८६४ मध्ये गाझीपूर येथे इंग्रजी शाळा स्थापन केली. इंग्रजीतील विविध विषयांवरील पुस्तकांचा उर्दू भाषेत अनुवाद घडवून आणण्यासाठी 'साइन्टिफिक सोसायटी' १८६५ मध्ये स्थापन केली. इ. स. १८७५ मध्ये सर सय्यद यांनी अलिगढ येथे मुस्लिमांना आधुनिक शिक्षण घेता यावे यासाठी 'मोहम्मेडन अँग्लो-ओरिएंटल स्कूल' ची स्थापना केली आणि १८७८ मध्ये त्या शाळेचे रूपांतर 'मोहम्मेडन अँग्लो-ओरिएंटल कॉलेज' मध्ये केले. सर सय्यद यांना पारंपरिक शिक्षण आणि आधुनिक इंग्रजी शिक्षण यांचा मेळ घालावयाचा होता असे त्यांच्या शिक्षणसंस्थांच्या नावावरून दिसते. सर सय्यद यांनी मोहम्मेडन एज्युकेशन कॉन्फरन्सची स्थापना केली. या संस्थेची अधिवेशने दरवर्षी भरविली जाऊन मुस्लिमांमध्ये आधुनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न केले गेले. अलिगढ महाविद्यालयाने आणि सर सय्यद यांच्या संस्थांनी आधुनिक शिक्षण मुस्लिमांमध्ये लोकप्रिय करण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली.

सर सय्यद यांनी मुस्लिमांमध्ये आधुनिक शिक्षणाचा प्रसार करून ब्रिटिश-मुस्लीम संबंध अधिक सौहार्दपूर्ण बनविले. त्याच वेळी मुस्लिमांनी राष्ट्रीय चळवळीत हिंदूंच्या बरोबरीने भाग घेऊ नये व या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसपासून दूर राहावे यासाठी प्रयत्न केले. प्रारंभी हिंदु-मुस्लीम ऐक्याचे पुरस्कर्ते असणारे सर सय्यद नंतर मात्र या भूमिकेपासून दूर गेले. राजकीय क्षेत्रात हिंदु-मुस्लीम ऐक्य हे अशक्य आहे अशी भूमिका त्यांनी घेतली. हिंदू व मुस्लीम परस्परांपासून वेगळे आहेत असे मत त्यांनी मांडले. इ. स. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाल्यावर मुस्लिमांनी काँग्रेसपासून दूर राहावे असा प्रसार सर सय्यद करू लागले. काँग्रेस ही ब्रिटिश शासनाच्या साम्राज्यवादाच्या विरोधात असल्यामुळे तिच्या नेतृत्वाखाली मुस्लीम गेल्यास त्यांचे नुकसान होईल असे सर सय्यद यांचे मत होते; तसेच काँग्रेस ही हिंदूंची संघटना असल्यामुळे मुस्लीम समाजाने काँग्रेसपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी मुस्लिमांना केले. कोणत्याही ब्रिटिशविरोधी चळवळीपासून मुस्लिमांनी दूर राहावे असा सर सय्यद यांचा प्रयत्न होता.

पुढे भारतात प्रातिनिधिक संस्था स्थापन व्हाव्यात यासाठी जेव्हा काँग्रेसने प्रयत्न केले, त्यालाही विरोध करण्यासाठी सर सय्यद यांनी 'अलिगढ इन्स्टिट्यूट गॅझेट'मधून प्रचार केला. हिंदू हे बहुसंख्य असल्यामुळे लोकशाही तत्त्वानुसार निवडणुकीवर आधारित प्रातिनिधिक संस्थांत त्यांचेच बहुमत राहील अशी भीती सर सय्यद यांना वाटत होती; यामुळे त्यांनी प्रातिनिधिक संस्थांना विरोध केला. काँग्रेसने केलेली प्रातिनिधिक संस्थांची मागणी मुस्लिमांना घातक ठरेल असे सर सय्यद यांना वाटत होते. मुस्लिमांवर हिंदूंचे वर्चस्व यातून स्थापन होईल आणि ही मागणी मान्य केल्यास मुस्लीम त्याला विरोध करतील असेही सर सय्यद यांनी स्पष्ट केले. ब्रिटिश भारतातून गेल्यावर मुस्लिमांच्या राजकीय हितांचे रक्षण करण्यासाठी, मुस्लिमांना राष्ट्रीय चळवळीपासून दूर ठेवण्यासाठी आणि ब्रिटिश शासनाला पाठिंबा देण्यासाठी सर सय्यद यांनी 'मोहम्मेडन अँग्लो-ओरिएंटल डिफेन्स असोसिएशन' ही संस्था स्थापन केली.

सर सय्यद यांनी अलिगढ येथे स्थापन केलेल्या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य थिओडोर बेक आणि त्यानंतर आलेले मॉरिसन यांनी अलिगढ येथील महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व एकूणच अलिगढ चळवळीला ब्रिटिश राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ ठेवण्यात, मुस्लिमांना काँग्रेसमध्ये जाऊ न देण्यात आणि मुस्लिमांना हिंदूंपासून वेगळा, स्वतंत्र गट म्हणून ठेवण्यात बरेच यश मिळविले.

सर सय्यद अहमद यांच्या राजकीय धोरणाचे मुख्य आधार पुढीलप्रमाणे होते– (१) राष्ट्रवादी शक्तींना विरोध, (२) लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला विरोध व प्रातिनिधिक संस्था स्थापन करण्यास विरोध, (३) ब्रिटिश शासनाबद्दल एकनिष्ठा आणि (४) हिंदु-मुस्लीम ऐक्याला विरोध. अर्थात सर सय्यद यांच्यापेक्षा वेगळे विचार असणारे बुद्रुद्दिन तय्यबजीसारखे मुसलमान काँग्रेसमध्ये यावेळी होते आणि तय्यबजींनी सर सय्यद यांना असा प्रश्न केला होता की, काँग्रेसच्या मागण्यांत असे काय आहे जे मुस्लिमांपेक्षा हिंदूंना अधिक फायदा देणारे आहे? किंवा मुस्लिमांच्या हिताला बाधा आणणारे आहे? आणि ते केवळ हिंदूंच्या हिताचे आहे? सर सय्यद यांना तय्यबीजींची भूमिका मान्य नव्हती. धर्म बाजूला ठेवून हिंदु-मुस्लीम यांनी एकत्र येऊन स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करावेत हे तय्यबाजींचे आवाहन सर सय्यद यांना मान्य नव्हते. थोडक्यात, भारतीय मुस्लिमांवर, विशेषत: उत्तर भारतातील मुस्लिमांवर सर सय्यद यांच्या विचारांचा प्रभाव पडला. सर सय्यद यांनी मुस्लिमांचे हितसंबंध हिंदूंपेक्षा वेगळे आहेत आणि ते मुस्लिमांनी जपले पाहिजेत आणि मुस्लिमांनी संघटित होऊन ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहावे हा दिलेल्या विचारांचा वारसा पुढे मुस्लीम लीगच्या नेत्यांनी चालविला. अर्थात मुस्लिमांमध्ये इंग्रजी शिक्षणासाठी केलेले सर सय्यद यांचे कार्य चांगले होते. मात्र अलिगढचे कॉलेज हे पुढे पाकिस्तानच्या मागणीसाठी झालेल्या चळवळीचे केंद्र राहिले, ज्यात तेथील मंडळींनी सक्रिय भाग घेतला. ब्रिटिशांनी या संस्थेला मदतही केली.

**बंगालची फाळणी (१९०५)**

बंगालची फाळणी करण्यामागे प्रशासकीय उद्देश आहे असे जरी शासनकर्त्यांनी प्रथम सांगितले तरी त्यामागे त्यांचा राजकीय हेतू होता. नव्या पूर्व बंगालच्या प्रांतात मुस्लीम बहुसंख्य आहेत आणि त्याचे लाभ त्यांना मिळणार आहेत याची जाणीव ब्रिटिशांनी मुस्लिमांना करून दिली. बंगालमधील मुस्लिमांना राष्ट्रीय चळवळीपासून दूर करून, राष्ट्रीय चळवळ दुर्बल करण्यासाठी व्हाइसरॉय लॉर्ड कर्झनने फाळणीचा निर्णय घेतला होता आणि स्वतंत्र, मुस्लीम बहुसंख्येच्या पूर्व बंगालच्या प्रांताच्या निर्मितीचे आमिष बंगाली मुस्लिमांना दाखविण्यात आले होते. याचा ब्रिटिशांना अपेक्षित असा फायदा झाला. बंगालच्या फाळणीविरोधी चळवळीपासून आणि नंतर सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीपासून मुस्लिमांनी स्वत:ला अलिप्त ठेवले.

**मुस्लिमांचे सिमला शिष्टमंडळ, १९०६**

ब्रिटिश राज्यकर्ते मुस्लिमांच्या राजकीय हक्कांचे संरक्षण करण्यास उत्सुक आहेत आणि त्यांना काँग्रेसच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळ निष्प्रभ करण्यासाठी व एकूण हिंदूंच्या विरोधात मुस्लिमांच्या पाठिंब्याची गरज आहे हे मुस्लिमांच्या लक्षात आले. त्यानंतर मुस्लीम नेत्यांनी व्हाइसरॉयकडे आपल्या मागण्यांसाठी शिष्टमंडळ नेण्याचे ठरविले. भारतीय राष्ट्रवादापासून आणि राष्ट्रीय चळवळीपासून मुस्लिमांना दूर ठेवणाऱ्या संघटनेची गरज राज्यकर्त्यांना होतीच; तेव्हा या हेतूने ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मुस्लीम शिष्टमंडळाचे स्वागत केले.

भारतीयांना राजकीय सुधारणा दिल्या जाणार आहेत याचे संकेत मिळताच अलिगढ चळवळीशी संबंध असलेले एक नेते, मोहसिन उलमुल्क यांनी पुढाकार घेऊन शिष्टमंडळ तयार केले. यात एकूण ३८ सभासद होते आणि या शिष्टमंडळाचे नेतृत्व आगाखान यांनी केले. या शिष्टमंडळाला व्हाइसरॉयपर्यंत घेऊन जाण्यात आणि आपल्या मागण्या मांडण्याबाबत ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मदत केली होती. मुस्लिमांच्या शिष्टमंडळाने व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांची १ ऑक्टोबर, १९०६ रोजी सिमला येथे भेट घेतली.

मुस्लीम शिष्टमंडळाने सादर केलेल्या मागणीपत्रात प्रामुख्याने खालील मागण्या केल्या होत्या– (१) मुस्लिमांसाठी स्वतंत्र, जातीय मतदारसंघ देण्यात यावेत. (२) शासनाच्या सर्व विभागांत, मुलकी, लष्करी, न्यायव्यवस्था इत्यादींमध्ये मुस्लिमांना योग्य ते प्रतिनिधित्व दिले जावे. (३) कायदेमंडळात मुस्लिमांना दिले जाणारे प्रतिनिधित्व किंवा शासनात त्यांना दिल्या जाणाऱ्या जागा त्यांच्या संख्येचा विचार न करता, मुस्लिमांचे राजकीय महत्त्व आणि ब्रिटिश साम्राज्याच्या रक्षणासाठी त्यांनी केलेले योगदान लक्षात घेऊन दिले जावे. (४) याशिवाय नगरपालिका,

जिल्हा बोर्ड, प्रांतिक कायदेमंडळे इत्यादींसाठी मुस्लिमांची निवड केवळ त्यांच्यासाठी असलेल्या जातीय मतदारसंघातून (स्वतंत्र मतदारसंघातून) व्हावी. (५) मुस्लिमांसाठी वेगळ्या विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आर्थिक मदत दिली जावी. (६) स्पर्धा परीक्षा न घेता मुस्लिमांच्या नेमणुका उच्च पदांवर केल्या जाव्यात. (७) उच्च न्यायालय आणि मुख्य न्यायालयात मुस्लीम न्यायाधीशांच्या नेमणुका केल्या जाव्यात.

मुस्लीम शिष्टमंडळाने सादर केलेल्या मागण्यांसंदर्भात व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांनी त्यांना मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले. विशेषत: मुस्लिमांच्या संख्येचा विचार न करता त्यांचे राजकीय महत्त्व आणि त्यांनी ब्रिटिश साम्राज्यासाठी केलेली सेवा लक्षात घेऊन त्यांना प्रतिनिधित्व सर्व स्तरांवर दिले जाईल असे आश्वासन मिंटो यांनी दिले. मिंटो यांना विशेष आनंद याबद्दल झाला होता की, त्यांनी बहुसंख्य मुस्लिमांना काँग्रेसकडे किंवा राष्ट्रीय चळवळीकडे आकृष्ट न होऊ देता, त्यांच्या निष्ठा व पाठिंबा ब्रिटिश सत्तेकडे खेचून आणण्यात यश मिळविले होते आणि या शिष्टमंडळाला दिलेल्या आश्वासनामुळे मुस्लिमांचे हितसंबंध वेगळे आहेत याला ब्रिटिशांनी आपली मान्यता दिली; तसेच ब्रिटिश हेच आपले खरे रक्षणकर्ते आहेत आणि त्यांची कृपादृष्टी सांभाळली तर आपली उन्नती होऊ शकते हे मुस्लिमांना पटले. परिणामी हिंदूपासून आणि एकूणच राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहण्याचे धोरण मुस्लिमांनी स्वीकारले. मुस्लीम जातीयवादाला अशा रीतीने प्रबळ, गतिमान करण्यात ब्रिटिशांची कुटील नीती यशस्वी ठरली. हिंदु–मुस्लीम ऐक्य हे यानंतर अशक्यप्राय ठरले व मुस्लिमांच्या फुटीर प्रवृत्तीमधून पाकिस्तानची मागणी पुढे आली. यात ब्रिटिशांनी मुस्लिमांना दिलेला पाठिंबा महत्त्वपूर्ण होता.

**मुस्लीम लीगची स्थापना, १९०६**

मुस्लिमांचे राजकीय व इतर हितसंबंध रक्षण करण्याबाबत व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांनी मुस्लीम शिष्टमंडळाला दिलेल्या आश्वासनामुळे मुस्लीम नेत्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेला खतपाणी मिळून ते उत्तेजित झाले आणि त्यांनी मुस्लिमांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी वेगळी राजकीय संघटना स्थापन करण्याचे ठरवले. बंगालमध्ये ढाका या ठिकाणी डिसेंबर, १९०६ मध्ये अखिल भारतीय मुस्लीम लीग या मुस्लिमांसाठीच्या नव्या राजकीय संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती–

(१) मुस्लिमांना राजकीय पातळीवर संघटित करणे.

(२) ब्रिटिश राज्यकर्त्यांबद्दल मुस्लिमांमध्ये निष्ठा निर्माण करणे.

(३) भारतातील मुस्लिमांच्या राजकीय हक्कांचे व हिताचे रक्षण करणे आणि त्यांच्या हिताच्या मागण्या ब्रिटिश राज्यकर्त्यांसमोर मांडणे.

(४) या उद्दिष्टांना बाधा न येऊ देता मुस्लिमांमध्ये इतर जमातींबद्दल वैरभावना निर्माण न होऊ देणे.

मुस्लीम लीगच्या स्थापनेत मुस्लीम जमीनदार, जहागीरदार, नोकरशाहीतून निवृत्त झालेले सरकारी अधिकारी, नवाब इत्यादी मंडळी प्रमुख होती. यांत विकार उलमुल्क, नवाब सलिमुल्ला आदी प्रमुख होते. ढाका हे बंगालमधील मुस्लीम बहुसंख्येच्या प्रदेशातील महत्त्वाचे ठिकाण होते व बंगालच्या फाळणीनंतर निर्माण झालेल्या नव्या पूर्व बंगाल प्रांताची राजधानी होती. मुस्लीम लीगच्या नेत्यांनी त्यावेळचा प्रमुख पक्ष काँग्रेसच्या ध्येय-धोरणांपासून आपली ध्येय–धोरणे वेगळी आहेत हे स्पष्ट केले; तसेच ब्रिटिश सत्ता भारतात टिकावी ही आपली इच्छा त्यांनी प्रगट केली होती. जर ब्रिटिश भारतातून गेले तर मुस्लीम जनता ही हिंदूंच्या आधिपत्याखाली जाईल आणि त्यांचे जीवन धोक्यात येईल म्हणून ब्रिटिश सत्तेच्या विरोधी भूमिका न घेता ती दृढमूल करण्यातच मुस्लिमांचे हित आहे अशी मुस्लीम लीगची विचारसरणी होती. त्याचबरोबर मुस्लिमांच्या हितासाठी अधिकाधिक हक्क, सवलती आणि अधिकार मिळविणे हे लीगचे धोरण ठरले.

## मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ, १९०९

व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे १९०९ च्या कायद्याने मुस्लिमांना स्वतंत्र, जातीय मतदारसंघ मिळाले. मुस्लिमांनी ब्रिटिशांबद्दल दाखविलेल्या निष्ठेचे हे फळ होते. मुस्लिमांना जातीय मतदारसंघ देण्याचा निर्णय दूरगामी राजकीय परिणाम करणारा होता. सर सय्यद अहमद व अलिगढ चळवळीचे हे धोरण होते की, हिंदू आणि मुस्लीम दोन जमाती किंवा राष्ट्रे असून त्यांचे हितसंबंध परस्परांपासून भिन्न आहेत, याला ब्रिटिश शासनाने मान्यता दिली. मुस्लिमांच्या वेगळ्या राजकीय अस्तित्वाला यामुळे चालना मिळाली व मुस्लीम फुटीरतावादाला प्रोत्साहन मिळाले आणि शेवटी याची परिणती पाकिस्तानच्या निर्मितीत झाली. मुस्लिमांना भारतीय राजकारणात ब्रिटिशांच्या पाठिंब्यामुळे महत्त्वपूर्ण स्थान मिळाले. याच्या बळावरच त्यांनी आपल्या काही मागण्या काँग्रेसकडून मान्य करून घेतल्या आणि जेव्हा काही मागण्यांना काँग्रेसने नकार दिला तेव्हा त्यांनी त्या ब्रिटिश शासनाकडून मान्य करून घेतल्या. विभक्त मतदारसंघांमुळे जातीयवादाला बळकटी आली.

## मुस्लिमांचा बदललेला दृष्टिकोन

वंगभंगाच्या आंदोलनामुळे इंग्लंडच्या राजाने बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा १९११ मध्ये केली. याचा धक्का भारतीय मुस्लिमांना बसला. आपला विश्वासघात ब्रिटिशांनी केला अशी त्यांची भावना झाली. भारताबाहेर या काळात अशा काही घटना घडल्या ज्यांमुळे ब्रिटिशांसह इतर युरोपीय राष्ट्रांनी, जे बहुतेक ख्रिश्चन धर्माचे होते, मुस्लीम देशांविरुद्ध आघाडी उभारली आहे अशी धारणा मुस्लिमांची झाली. जसे १९११ मध्ये आफ्रिकेतील मोरोक्को हा मुस्लीम देश फ्रेंचांनी जिंकला, इजिप्तवर इंग्लंडचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. इजिप्तप्रमाणे इराणही इंग्लंड आणि रशियाच्या प्रभावाखाली आला होता आणि तुर्कस्तानच्या प्रभावाखालील त्रिपोली इटलीने जिंकले होते. याशिवाय बाल्कन द्वीपकल्पातील तुर्कस्तानच्या वर्चस्वाखालील ख्रिश्चन राज्यांनी तुर्कस्तानच्या सुलतानाविरुद्ध युद्ध पुकारले. याला इंग्लंड, फ्रान्स आणि रशियाचा पाठिंबा होता. या बाल्कन युद्धात तुर्कस्तानचा पराभव होऊन त्याला बराच भाग गमवावा लागला.

नंतर १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. यात जर्मनीविरुद्ध इंग्लंड आणि फ्रान्स होते. तुर्कस्तानने जर्मनीच्या बाजूने युद्धात उडी घेतली; यामुळे इंग्लंड व तुर्कस्तान हे एकमेकांचे शत्रू बनले. तुर्कस्तानचा सुलतान हा सर्व मुस्लिमांचा परंपरेने धर्मप्रमुख होता. वरील सर्व घटनांमुळे भारतीय मुस्लिमांमध्ये ब्रिटिशविरोधी भावना निर्माण झाली आणि आता त्यांची सहानुभूती तुर्कस्तानच्या बाजूने होती. वरील घटना म्हणजे ख्रिश्चन राष्ट्रांनी मुस्लीम देशांविरुद्ध उघडलेली आघाडी आहे असे भारतीय मुस्लिमांचे मत बनले. याशिवाय मुस्लीम लीगमधील बॅरिस्टर मुहम्मद अली जीना आणि इतरांनी, भारतीय मुस्लिमांनी काँग्रेसच्या सहकार्याने राजकीय सुधारणांची मागणी करावी असे प्रयत्न केले. याला यश येऊन काँग्रेस व मुस्लीम लीग हे दोन्ही पक्ष राजकीय हक्कांसाठी लढा देण्यासाठी एकत्र आले.

## लखनौ करार, १९१६

भारतीय मुस्लीम हे ब्रिटिशांच्या विरोधात आहेत आणि राजकीय हक्कांच्या प्राप्तीसाठी काँग्रेसशी सहकार्य करून एकत्रित लढा देण्यास तयार आहेत, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्रत्यक्ष करारासाठी लोकमान्य टिळकांनी प्रयत्न केले. याच सुमारास लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगातून सहा वर्षांच्या शिक्षेनंतर बाहेर पडले होते आणि काँग्रेसमध्ये त्यांना पुन्हा प्रवेश देण्यात आला होता.

स्वराज्यप्राप्ती हेच समान ध्येय मुस्लीम लीग आणि काँग्रेसने मान्य केले आणि या बदल्यात काँग्रेसने मुस्लिमांसाठी 'स्वतंत्र व जातीय मतदारसंघ' मान्य केले. त्याचबरोबर मुस्लिमांना त्यांच्या लोकसंख्येपेक्षा अधिक प्रतिनिधित्व मिळावे हे मान्य केले गेले. मुस्लिमांच्याबाबत कोणतेही विधेयक किंवा ठराव फेटाळण्याचा मुस्लिमांचा नकाराधिकार मान्य करण्यात आला. पर्यायाने मुस्लीम लीग हीच मुस्लिमांची प्रातिनिधिक संस्था आहे हे मान्य करण्यात आले. हाच 'लखनौ करार' होता. मुस्लिमांचे हितसंबंध हिंदूंपेक्षा वेगळे आहेत हे काँग्रेसने मान्य केले.

मुस्लीम यापुढे कोणत्याही जादा मागण्या करणार नाहीत असे बंधन मुस्लिमांनी स्वत:वर घालून घेतले नव्हते. काँग्रेसशी मुस्लिमांनी केलेले सहकार्य हे तात्कालिक ब्रिटिशविरोधी भावनेमुळे घडून आले होते, हिंदूबरोबर आपले हितसंबंध समान आहेत ही भावना त्यात नव्हती. आपल्या मागण्या मान्य करून घेऊनच मुस्लिमांनी ब्रिटिशांविरुद्ध स्वराज्याच्या ध्येयासाठी एकत्र लढण्यास मान्यता दिली होती.

लोकमान्य टिळकांनी लखनौ कराराचा प्रस्ताव काँग्रेसकडून मान्य करून घेतला. त्यांची भूमिका अशी होती की, स्वतंत्र मतदारसंघ मुस्लिमांना १९०९ च्या कायद्याने शासनाने यापूर्वीच दिले आहेत. ते आपण मान्य करायचे की नाही एवढेच आपल्या हाती आहे. ते मान्य करून मुस्लिमांना काँग्रेसच्या बाजूने वळवून स्वराज्यप्राप्तीसाठीच्या ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्यात त्यांना सामील करून घ्यावे असे टिळकांचे मत होते. टिळकांनी काँग्रेस व मुस्लीम लीग यांना एकत्र करून स्वराज्यप्राप्तीचा लढा, 'ब्रिटिश शासन विरुद्ध भारतीय जनता' असा दुरंगी केला. काँग्रेसने विभक्त मतदारसंघ मान्य केले नसते तरी प्रत्यक्षात काहीही फरक पडला नसता.

**खिलाफत चळवळ (१९१७–२२)**

लखनौ करारानंतर काही वर्षे विविध कारणांमुळे हिंदु-मुस्लीम ऐक्य टिकून राहिले. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तानने इंग्लंडविरुद्ध उडी घेतली. इंग्लंडने यावेळी भारतीय मुस्लिमांना असे आश्वासन दिले की, अरेबियातील मुस्लीम पवित्र स्थळांना धक्का लागू दिला जाणार नाही आणि तुर्कस्तानची अखंडता टिकविली जाईल; परंतु युद्धात तुर्कस्तानचा पराभव केल्यानंतर तुर्कस्तानावर कडक निर्बंध लादण्यात आले. तुर्कस्तानच्या ताब्यातून इस्लामची पवित्र स्थळे मुस्लिमेतरांकडे गेली होती. तुर्कस्तानच्या सुलतानाची म्हणजेच मुस्लिमांचा धर्मप्रमुख असलेल्या खलिफाची अप्रतिष्ठा झाली होती. तुर्कस्तानला अनेक भाग गमवावे लागले होते. मुस्लीम सत्तांच्या भारताबाहेर होणाऱ्या पराभवामुळे भारतीय मुस्लिमांचे राजकीय महत्त्व कमी होण्याची भीती त्यांना वाटत होती. यासाठी खलिफाच्या पुनर्स्थापनेसाठी खिलाफत चळवळ उभारण्याचा निर्णय भारतीय मुस्लिमांनी घेतला.

याच सुमारास पंजाबमध्ये रौलेट कायद्याच्या अत्याचाराखाली जनता भरडून निघत होती. त्याचा निषेध करावयाचा होता. यासाठी आणि इतर कारणांसाठी गांधीजींनी असहकार चळवळ सुरू करण्याचे ठरविले होते. या चळवळीला मुस्लिमांचा पाठिंबा मिळविण्यासाठी गांधीजींनी खिलाफतीच्या प्रश्नाला काँग्रेसच्या वतीने पाठिंबा दिला आणि असहकार चळवळ सुरू केली. खिलाफत परिषदेनेही असहकाराच्या चळवळीला मान्यता दिली. खिलाफत परिषदेच्या मुख्य मागण्यांत तुर्कस्तानचे सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडता टिकविण्यासाठी प्रयत्न, इस्लामच्या पवित्र स्थळांवरील मुस्लिमेतरांचे नियंत्रण दूर करणे इत्यादींचा समावेश होता.

खिलाफत चळवळ हा मुस्लिमांचा धार्मिक प्रश्न होता. ही चळवळ मुस्लिमांना भारताच्या प्रश्नावर संघर्ष करण्यासाठी उद्युक्त करणारी चळवळ नव्हती; उलट देशाबाहेरच्या प्रश्नाशी ही निगडित असलेली चळवळ होती. या चळवळीचे स्वरूप सकल इस्लामवादी (पॅन-इस्लामिक) होते. यावेळी मुस्लीम धर्मगुरूंनी फतवे काढून मुस्लिमांनी ब्रिटिश सैन्यात नोकरी करू नये, ब्रिटिश शासनाला सहकार्य करू नये इत्यादी आदेश दिले. या चळवळीने मुस्लिमांना देशापेक्षा देशाबाहेरच्या मुस्लीम प्रश्नांशी निगडित होण्याची सवय लावली अशी टीका केली जाते. मुस्लिमांच्या धार्मिक भावनांना आवाहन केले गेल्यामुळे त्यांच्या धार्मिक कट्टरपणातून १९२१ मध्ये केरळमध्ये मोपला मुस्लिमांनी उठाव केला. या उठावात शेकडो हिंदू कुटुंबांवर अत्याचार करण्यात आले, स्त्रियांची विटंबना करण्यात आली आणि सक्तीची धर्मांतरे घडविण्यात आली. खिलाफतीच्या राज्याच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली. खिलाफतीच्या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या मुस्लीम नेत्यांनी मोपलांनी केलेल्या अत्याचारांचा निषेध केला नाही. काँग्रेसनेही या अत्याचारांचा निषेध नि:संदिग्ध शब्दांत केला नाही. या खिलाफत चळवळीने निर्माण केलेले हिंदु-मुस्लीम ऐक्य वरवरचे होते हे स्पष्ट झाले. असहकार चळवळ गांधीजींनी अचानक मागे घेतल्यानंतर मुस्लिमांना धक्का बसला.

### हिंदूंची प्रतिक्रिया

खिलाफत चळवळ ज्या खलिफाच्या पुनर्स्थापनेसाठी सुरू करण्यात आली होती, त्या खलिफाचे पद तुर्कस्तानात आलेल्या नव्या शासकांनी रद्द केले. इ. स. १९२२ नंतर हिंदु-मुस्लीम संबंध खूपच बिघडले. भारतात अनेक ठिकाणी जातीय दंगे झाले. यात वायव्येकडे असलेल्या कोहट या ठिकाणच्या अल्पसंख्य हिंदू व शिखांची दयनीय अवस्था होती. अनेक ठिकाणी मोपला उठावाच्या छोट्या आवृत्त्या घडून आल्या. याची प्रतिक्रिया हिंदू समाजावर होऊन हिंदू संघटनेच्या चळवळीला गती व जोम प्राप्त झाला. सक्तीने किंवा आमिष दाखवून इतर धर्मात गेलेल्या हिंदूंना पुन्हा हिंदू धर्मात आणण्यासाठी शुद्धी चळवळ हिंदू संघटनांनी हाती घेतली. हिंदूंमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हिंदू संघटन कार्यावर भर देण्यात आला. यात आर्य समाज, हिंदू महासभा यांसारख्या संघटना होत्या आणि स्वामी श्रद्धानंदांसारख्या व्यक्तीही होत्या. पुढे डिसेंबर, १९२६ मध्ये अब्दुल रशीद याने स्वामी श्रद्धानंद यांची हत्या केली, यावरून हिंदू संघटनकार्याची मुस्लिमांवर झालेली प्रतिक्रिया लक्षात येते. इ. स. १९२५ मध्ये नागपूर येथे डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी जातिभेद मिटवून, समतेच्या तत्त्वावर हिंदूंच्या सामाजिक संघटनेसाठी आणि त्यांच्यात विजिगीषू वृत्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. दलित आणि सवर्ण यांतील अंतर मिटवून, अस्पृश्यता दूर करून, दलितांना चांगली वागणूक दिली जावी यासाठी हिंदू समाजातील काहींनी प्रयत्न सुरू केले. मुस्लिमांनी हिंदू समाजातील शुद्धी व संघटन या चळवळींना हरकत घेतली; परंतु ज्या मार्गांनी मुस्लिमांनी आपली संख्या वाढविली होती त्या मार्गांना हिंदूंना विरोध व्हावा हे हिंदूंना मान्य नव्हते.

## मुस्लीम लीगचे राजकारण (१९२८-१९३४)

इ. स. १९२७ मध्ये सायमन कमिशनच्या नियुक्तीनंतर कमिशनमध्ये एकही भारतीय नसल्यामुळे त्यावर भारतीयांनी बहिष्कार घातला होता. परंतु मुस्लीम लीगच्या सर मुहम्मद शफी यांच्या अध्यक्षतेखाली लीगच्या एका गटाने सायमन कमिशनचे स्वागत केले.

भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनी भारतीयांना आव्हान दिले होते की, ते जातीय प्रश्नांची सोडवणूक करणारी सर्वसंमत अशी स्वराज्याची घटना तयार करू शकत नाहीत. याला उत्तर म्हणून पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटना तयार करण्यासाठी स्थापन करण्यात आली. या समितीने तयार केलेल्या मसुद्याला 'नेहरू रिपोर्ट' असे म्हटले जाते. हा रिपोर्ट डिसेंबर, १९२८ मध्ये कोलकाता येथे भरलेल्या सर्वपक्षीय बैठकीसमोर ठेवण्यात आला. जातीय प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत नेहरू अहवालात खालील मुद्द्यांचा समावेश होता–

(१) निवडणुका संयुक्त मतदारसंघाच्या आधारावर लढविल्या जाव्यात.

(२) केंद्रीय कायदेमंडळात व प्रांतिक कायदेमंडळात धार्मिक अल्पसंख्याकांसाठी जागा त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव ठेवाव्यात.

(३) सिंध मुंबई प्रांतातून वेगळा करण्यात यावा.

मुस्लीम लीगच्या जीना यांनी नेहरू रिपोर्टला तीन दुरुस्त्या सुचविल्या आणि त्या दुरुस्त्या मान्य केल्यास आपण नेहरू रिपोर्ट आणि त्यातील संयुक्त मतदारसंघाचे तत्त्व मान्य करू असे स्पष्ट केले. जीनांनी सुचविलेल्या दुरुस्त्या पुढीलप्रमाणे होत्या–

(१) केंद्रीय विधिमंडळात (कायदेमंडळात) मुस्लिमांना ३३ टक्के म्हणजे एक-तृतीयांश प्रतिनिधित्व दिले जावे.

(२) पंजाब, बंगालमध्ये मुस्लिमांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा मिळाव्यात, जेणेकरून त्यांचे या प्रांतांतील बहुमत टिकविले जाईल. मात्र इतर प्रांतांत मुस्लिमांना सध्या दिले जाणारे जागांचे आरक्षण सुरू ठेवावे.

(३) सिंध मुंबई प्रांतापासून वेगळा केला जावा.

(४) वायव्य सरहद्द प्रांत इतर प्रांतांच्या बरोबरीत मानला जावा.

नेहरू अहवालात मुस्लिमांना केंद्रीय विधिमंडळात तीस टक्के प्रतिनिधित्व दिले होते; परंतु जीनांच्या मागण्या सर्वपक्षीय परिषदेत मान्य केल्या गेल्या नाहीत. मुस्लीम लीगच्या मुहम्मद शफी व आगाखान गटाला मुस्लिमांना मिळालेले विभक्त मतदारसंघ सोडण्याची इच्छा नव्हती; त्यामुळे जीनांच्या दुरुस्त्यांना त्यांचा विरोध होता आणि त्यांचा नेहरू अहवालाला विरोध होता हे ओघानेच आले. जीनांना अभिप्रेत असलेले भावी घटनेतील दुर्बल केंद्र सरकार काँग्रेसला मान्य नव्हते. हिंदू महासभा आणि शिखांनाही नेहरू रिपोर्टातील काही तरतुदी मान्य नव्हत्या.

**जीनांचे चौदा मुद्दे**

जीनांच्या दुरुस्त्या कोलकाता येथील सर्वपक्षीय परिषदेत फेटाळल्या जाताच जीना संतप्त होऊन तेथून बाहेर पडले. काँग्रेस मुस्लिमांच्या मागण्यांना विरोध करीत आहे आणि नेहरू रिपोर्ट हा हिंदू दृष्टिकोनातून तयार केला आहे, असा आरोप जीनांनी केला. काँग्रेसने नेहरू रिपोर्ट स्वीकारून मुस्लीम मताची दखल घेतली नाही अशी जीनांची धारणा झाली. यानंतर जीनांनी कट्टर जातीयवादी भूमिका स्वीकारली आणि मुस्लीम लीगच्या राजकारणाला कट्टर जातीयवादी दिशा दिली. यातूनच पुढे मुस्लीम विभक्तवादाचा उगम झाला आणि पाकिस्तानची निर्मिती झाली.

याच सुमारास ब्रिटिश शासनाने असे घोषित केले की, भारतातील हिंदू व मुस्लीम यांच्यात एकमत जोपर्यंत होत नाही तोपर्यंत भारताला राजकीय सुधारणा दिल्या जाऊ शकणार नाहीत; तसेच याच सुमारास गांधीजींनीही असे मत व्यक्त केले की, हिंदू व मुस्लीम जोपर्यंत एक सर्वमान्य योजनेला मंजुरी देत नाहीत तोपर्यंत भारतातील घटनात्मक प्रश्नांची सोडवणूक अशक्य आहे. अशा रीतीने मुस्लिमांना भारतातील जातीय प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत नकाराधिकार मिळाला. हा त्यांना मिळालेल्या हुकुमाचा एक्का त्यांनी वापरणे अत्यंत साहजिकच होते. या नकाराधिकाराच्या बळावर मुस्लिमांनी त्यांना हव्या त्या मागण्या मान्य करून घेण्यात यश मिळविले.

मार्च, १९२९ मध्ये दिल्ली येथे जीनांनी मुस्लीम लीगच्या बैठकीत नेहरू रिपोर्टमधील घटनेचा निषेध करून मुस्लिमांच्या वतीने चौदा मागण्या मांडल्या. या मागण्या नंतरच्या काळात मुस्लीम लीगच्या राजकारणाचा आधार राहिल्या. या मागण्या पुढीलप्रमाणे होत्या–

(१) भावी राज्यघटनेचे स्वरूप संघराज्यात्मक असावे आणि उर्वरित (शेष) अधिकार प्रांतांना दिले जावेत.

(२) सर्व प्रांतांना समान स्वायत्तता मिळावी.

(३) प्रत्येक प्रांतातील विधिमंडळ व निर्वाचित संस्था यांची घडण या तत्त्वावर व्हावी की, प्रत्येक प्रांतात अल्पसंख्याकांना पुरेसे आणि परिणामकारक प्रतिनिधित्व दिले जाईल; तसेच हे करीत असताना बहुसंख्याकांचे रूपांतर अल्पसंख्याकांत होणार नाही किंवा बहुसंख्य आणि अल्पसंख्य समान होणार नाहीत याची दक्षता घेतली जावी. दुसऱ्या शब्दांत अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व देताना कोणत्याही प्रांतांतील बहुसंख्य गटाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे. त्यांच्या प्रतिनिधींच्या संख्येत घट केली जाऊ नये.

(४) केंद्रीय विधिमंडळात मुस्लीम प्रतिनिधींची संख्या एक–तृतीयांशपेक्षा कमी असू नये.

(५) जातीय गटांचे प्रतिनिधी सध्या सुरू असलेल्या पद्धतीप्रमाणे विभक्त, जातीय मतदारसंघातून निवडले जावेत. मात्र कोणत्याही जमातीला स्वतंत्र मतदारसंघाऐवजी संयुक्त मतदारसंघ हवा असल्यास तो घेण्याची मुभा असावी.

(६) भविष्यात प्रादेशिक पुनर्रचना करावयाची झाल्यास पंजाब, बंगाल व वायव्य सरहद्द प्रांतांतील मुस्लीम बहुसंख्येवर आणि मताधिक्यावर कोणताही विपरीत परिणाम होता कामा नये.

(७) श्रद्धा, पूजा, रीतिरिवाज, धार्मिक स्वातंत्र्य इत्यादींबाबत तसेच धार्मिक प्रचार, संघटन व शिक्षण इत्यादींबाबत सर्व जमातींना व समाजघटकांना स्वातंत्र्य असावे.

(८) एखाद्या विधेयकाने किंवा ठरावाने आपल्या जमातीवर अनिष्ट परिणाम होईल असे विधिमंडळ किंवा निर्वाचित संस्थेतील तीन-चतुर्थांश प्रतिनिधींना वाटले तर ते विधेयक किंवा ठराव किंवा त्या दोन्हींचा कोणताही भाग संमत होऊ नये.

(९) मुंबई प्रांतातून सिंध वेगळा करण्यात यावा.

(१०) वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान यांत राजकीय सुधारणा इतर प्रांतांप्रमाणेच अमलात आणल्या जाव्यात.

(११) राज्यांमधील व स्थानिक स्वराज्य संस्थांतील सेवांमध्ये, सेवापात्रतेसंबंधीच्या अटी ध्यानात घेऊन अन्य भारतीयांबरोबरच मुस्लिमांनाही पुरेशा जागा मिळतील अशी तरतूद घटनेत केली जावी.

(१२) मुस्लीम संस्कृती, मुस्लिमांचे शिक्षण, भाषा, धर्म, वैयक्तिक कायदे व धर्मादाय संस्था यांना पुरेसे संरक्षण देण्याची तरतूद घटनेतच करावी आणि सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानात मुस्लीम संस्थांना न्याय्य व योग्य भाग मिळेल याची तरतूद घटनेत केली जावी.

(१३) मुस्लिमांना कमीत कमी एक-तृतीयांश प्रतिनिधित्व असल्याशिवाय केंद्रीय किंवा प्रांतीय मंत्रिमंडळ बनविले जाऊ नये.

(१४) भारतीय संघराज्याच्या घटक राज्यांच्या संमतीशिवाय केंद्रीय विधिमंडळाने घटनेत कोणतेही बदल करू नयेत.

मुस्लिमांच्या मागण्या वाढतच जात होत्या. नेहरू रिपोर्टने संयुक्त मतदारसंघ मान्य केले तरी ते जीनांना अमान्य होते आणि नेहरू रिपोर्ट ब्रिटिश शासनाने विचारात घेतला नाही हा जीनांसाठी विजय होता. मुस्लीम आणि इतर जमातींत तडजोड होण्याची शक्यता कमी होत गेली.

**गोलमेज परिषदा व मुस्लीम लीग**

भारतातील घटनात्मक प्रश्न सोडविण्यासाठी इंग्लंडमध्ये ब्रिटिश शासनाने गोलमेज परिषदा बोलाविल्या. पहिली गोलमेज परिषद १९३०-३१ या काळात झाली. पहिल्या गोलमेज परिषदेला विविध जाती-जमाती, धार्मिक गटांचे नेते बोलाविण्यात आले होते. त्यांची निवड अर्थातच ब्रिटिश शासनाने केली होती. मुस्लीम लीगने गोलमेज परिषदेचे स्वागत केले आणि त्यात आपले प्रमुख नेते पाठविले. मुस्लीम लीगच्या जीना, मुहम्मद शफी, आगाखान आणि इतर मुस्लीम संघटनांच्या सदस्यांनी हे स्पष्ट केले की, कोणतीही घटना मुस्लिमांना तोपर्यंत मान्य होणार नाही जोपर्यंत त्या घटनेत मुस्लिमांच्या हितसंबंधांना पुरेसे संरक्षण दिले जात नाही आणि हे हितसंबंध योग्य रीतीने घटनेत जोपासले आहेत किंवा नाहीत हे ठरविण्याचा अधिकार मुस्लिमांचाच असेल. याशिवाय जीनांच्या चौदा मुद्द्यांतील महत्त्वाच्या मागण्या या परिषदेत मांडल्या गेल्या. ब्रिटिश नोकरशाही मुस्लिमांच्या बाजूने असल्यामुळे हिंदु-मुस्लीम प्रश्नावर तडजोड झाली नाही. या परिषदेत काँग्रेसने भाग घेतला नव्हता. काँग्रेसने यावेळी सविनय कायदेभंगाची चळवळ चालविली होती.

दुसरी गोलमेज परिषद १९३१ च्या सप्टेंबरमध्ये सुरू झाली. यात काँग्रेसने भाग घेतला होता आणि गांधीजींनी काँग्रेसचे प्रतिनिधित्व केले. या परिषदेतसुद्धा जातीय प्रश्नावर एकमत झाले नाही किंवा तडजोड झाली नाही. इतर जमातींच्या प्रतिनिधींनीही सवलती आणि हक्कांची मागणी पुढे रेटली. शेवटी ब्रिटिश पंतप्रधान मॅक्डोनॉल्ड यांनी जातीय निवाडा १९३२ मध्ये जाहीर केला. या निवाड्याने जीनांच्या चौदा मागण्यांतील बहुतेक मागण्या मान्य केल्या होत्या; तसेच या जातीय निवाड्याने (कम्युनल अवॉर्ड) मुस्लीम, दलित, भारतीय ख्रिश्चन, अँग्लो-इंडियन, युरोपीय, जमीनदार, शीख इत्यादींना स्वतंत्र मतदारसंघ दिले होते. यातून भारतीय समाजाचे आणखीनच विघटन होणार हे स्पष्ट होते. या निवाड्याने ज्या प्रांतांत हिंदू बहुसंख्य होते त्या प्रांतांत मुस्लिमांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्तीचे प्रतिनिधित्व देण्यात आले.

विभक्त मतदारसंघांचा दुष्परिणाम असा होता की, निवडणुकीत मुस्लीम उमेदवारांना फक्त मुस्लीम मतदारांनाच आपल्याकडे वळवून घेण्याची आवश्यकता होती. मुस्लीम उमेदवारांना हिंदू किंवा अन्य जमातींशी निवडणुकीत मतांसाठी संपर्क ठेवण्याचे कारणच उरले नाही. मुस्लीम उमेदवार मुस्लीम मतदारांवरच अवलंबून असल्यामुळे हिंदु-मुस्लीम ऐक्य प्रक्रियेत अडथळा आला; याचमुळे पुढे पाकिस्तानच्या मागणीसाठी मुस्लीम मतदारांना आवाहन करणे सोपे गेले. अनेक जमातींना विभक्त मतदारसंघ दिल्यामुळे प्रत्येक जमात स्वत:ला स्वतंत्र ठेवण्यासाठी धडपडू लागली आणि राष्ट्रीय ऐक्य आणखीनच अवघड बनले.

**महम्मद इकबाल, रहमत अली व मुस्लीम फुटीरतावाद**

इकबाल (१८७३-१९३८) हे उर्दू कवी आणि तत्त्वचिंतक होते; परंतु राजकारणातही त्यांचा सहभाग होता. भारत हा एक राष्ट्र नाही असे इकबाल यांचे मत होते. उलट भारतात मुस्लिमांचा एक वेगळा धार्मिक आणि सांस्कृतिक गट आहे आणि त्या दृष्टीने त्या गटाला संरक्षण मिळाले पाहिजे असे त्यांचे मत होते. भारतात लोकशाही प्रस्थापित होण्याला इकबाल यांचा विरोध होता. लोकशाहीत एका जमातीचीच सर्व सत्ता (Communal Oligarchy) स्थापित होईल अशी भीती त्यांना वाटत होती. अनेक मुद्द्यांच्याबाबत इकबाल आणि सर सय्यद अहमद यांच्या विचारांत साम्य दिसून येते. इस्लाममधील नवजागरणाचे ते कवी होते. धार्मिकतेची भावना मुस्लिमांमध्ये निर्माण करून, राजकारणाची त्याला जोड देऊन मुस्लिमांना संघटित करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. त्यांच्या विचारात वहाबी चळवळीची धार्मिक निष्ठा आणि सर सय्यद अहमद यांची आधुनिकता दोन्ही दिसून येतात. मुस्लिमांच्या राजकारणाला त्यांनी तात्त्विक आधार दिला.

डिसेंबर, १९३० मध्ये अलाहाबाद येथे मुस्लीम लीगच्या अधिवेशनात इकबाल यांनी अध्यक्षीय भाषणात आणि अन्यत्र केलेल्या भाषणांत भारतात मुस्लिमांचे एक स्वतंत्र राज्य असले पाहिजे असे मत मांडले. त्यांच्या कल्पनेतील स्वतंत्र मुस्लीम राज्यात पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध व बलुचिस्तान या प्रदेशांचा समावेश होता. भारतामध्येच 'मुस्लीम भारत' ही इकबालांची मागणी होती. स्वयंशासित भारतात संघराज्य असावे व त्या संघराज्यातील घटक राज्यांच्या संमतीने संघराज्य सरकारला देण्यात आलेल्या विशिष्ट अधिकारांव्यतिरिक्त उर्वरित सर्व अधिकार घटक राज्यांना असले पाहिजेत असे इकबाल यांचे मत होते. मात्र नंतर त्यांनी संघराज्याच्या कल्पनेला सोडून देऊन स्वतंत्र मुस्लीम राज्याचा पुरस्कार केला. इकबाल हे पॅन-इस्लामवादी (सर्व मुस्लीम एक आहेत) होते.

इकबालांच्या १९३० च्या भाषणात त्यांनी 'मुस्लिमांसाठीच वेगळ्या भूमीची (मुस्लीम होमलॅन्ड)' वेगळ्या राज्याची जी भूमिका मांडली ती मुस्लीम लीगच्या 'पाकिस्तान'च्या मागणीला प्रेरणा देणारी ठरली. या अर्थाने इकबाल यांना पाकिस्तानच्या कल्पनेचे जनक म्हटले जाते. इ. स. १९३२ मध्ये इकबाल आणि मुस्लीम संघटनांच्या इतर नेत्यांनी हे स्पष्ट केले होते की, हिंदू आणि मुस्लिमांचे राजकीय व सामाजिक हितसंबंध वेगवेगळे असल्यामुळे ते एकत्र येऊ शकणार नाहीत. इकबालांच्या व्यक्तित्वामागे असलेल्या प्रतिष्ठेमुळे त्यांनी मांडलेल्या स्वतंत्र मुस्लीम राज्याच्या कल्पनेने अनेकांच्या मनात घर केले आणि त्याच्या प्राप्तीसाठी ते कार्यरत झाले. इकबाल यांनी जीनांना पत्र लिहून आग्रह केला की, भारताच्या वायव्येला व ईशान्येला, मुस्लीम बहुसंख्येच्या प्रदेशात, स्वतंत्र आणि सार्वभौम मुस्लीम राज्ये निर्माण करण्यावर भर द्यावा. याचा परिणाम जीनांवर झाला.

पाकिस्तान या स्वतंत्र मुस्लीम राज्याच्या राजकीय उद्दिष्टाची कल्पना रहमत अली या तरुणाने गोलमेज परिषदेसाठी इंग्लंडमध्ये गेलेल्या मुस्लीम प्रतिनिधींसमोर १९३० मध्ये 'नाऊ ऑर नेव्हर' (आता नाही तर मग कधीच नाही) या पुस्तिकेच्या रूपाने मांडली. रहमत अली त्या वेळी केम्ब्रिज येथे शिकत होते. रहमत अलींच्या कल्पनेतील स्वतंत्र मुस्लीम राज्यात अर्थातच मुस्लीम बहुसंख्य असलेले पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, काश्मीर, सिंध व बलुचिस्तान या प्रांतांचा समावेश होता. रहमत अलींनी स्पष्ट केले की, 'मुस्लीम व हिंदू ही दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत.

धर्म, आचार-विचार, रीतिरिवाज, संस्कृती, परंपरा, इतिहास, साहित्य, वारसाहक्काचे कायदे, आर्थिक व्यवस्था, विवाहपद्धती इत्यादींबाबतीत हिंदू व मुस्लीम यांच्यात प्रचंड तफावत आहे. त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत; त्यामुळे मुस्लिमांची स्वतंत्र राष्ट्राची मागणी योग्य आहे.' इ. स. १९३३ च्या सुमारास रहमत अलींनी आपल्या स्वतंत्र मुस्लीम राज्याच्या कल्पनेच्या प्रचारासाठी चळवळ उभारली. रहमत अलींनी मांडलेला विचार पुढे जीनांनी द्विराष्ट्रवादाच्या सिद्धान्ताच्या रूपाने अधिक ठोसपणे मांडला.

## इ. स. १९३४ नंतरचे लीगचे राजकारण

### १९३५ च्या निवडणुका

इ. स. १९३५ च्या कायद्यानुसार प्रांतांत लोकनियुक्त सरकारे स्थापन करण्याच्या हेतूने शासनाने निवडणुका घेण्याचे ठरविले. इ. स. १९३६ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसला चांगले यश मिळाले. मात्र मुस्लीम लीगचे यश मर्यादित होते. अकरा प्रांतांतील विधिमंडळात मुस्लिमांसाठी ठेवलेल्या एकूण ४८२ जागांपैकी मुस्लीम लीगला फक्त १०९ जागा मिळाल्या. विशेष बाब अशी की, मुस्लीम बहुसंख्या असलेल्या पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत इत्यादी प्रांतांत मुस्लीम लीगची स्थिती चांगली नाही हे स्पष्ट झाले. या प्रांतांत मुस्लीम लीगशिवाय इतर मुस्लीम पक्ष यशस्वी ठरले होते. यांमध्ये वायव्येकडे युनियनिस्ट हा पक्ष प्रभावी होता, ज्याचे नेते सिकंदर हयातखान होते; तर बंगालकडे कृषक प्रजा पार्टी हा पक्ष प्रभावी होता, ज्याचे नेते फजलूल हक हे होते. काँग्रेसने आठ प्रांतांत मंत्रिमंडळे स्थापन केली. मात्र त्यांनी कुठेही, विशेषतः उत्तर प्रदेशात (संयुक्त प्रांत) मुस्लीम लीगला मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेतले नाही. काँग्रेस मुस्लीम लीगला सत्तेत सहभागी करून घेण्यास तयार नाही, तेव्हा आपण वेगळा मार्ग चोखाळला पाहिजे असा निर्णय जीनांनी घेतला. अर्थात, काँग्रेसने संयुक्त प्रांतांतील मुस्लीम लीग काँग्रेसमध्ये विलीन झाल्यास मंत्रिमंडळात स्थान देण्याचे मान्य केले होते. जीनांनी यानंतर ताठर, कट्टर धार्मिक भूमिका घेतली त्याचे आणखी एक कारण काँग्रेसने सत्तेत सहभागी करून घेतले नाही हे होते; तर दुसरे कारण असे होते की, मुस्लीम बहुसंख्येच्या प्रांतांतसुद्धा मुस्लीम लीग आपले एकमेव नेतृत्व सिद्ध करू शकली नाही. तेव्हा ही दोन उद्दिष्टे घेऊन सर्व मुस्लिमांना मुस्लीम लीगच्या झेंड्याखाली आणण्यासाठी जीनांनी कंबर कसली.

### मुस्लीम लीगचे धार्मिक आवाहन

जीनांनी यानंतर आपल्या पक्षाच्या प्रचाराची दिशा बदलली. राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर मते न मागता मुस्लिमांच्या धार्मिक भावनांना हात घालून धार्मिक अस्मितेला आवाहन करण्याचे जीनांनी ठरविले. धार्मिक प्रश्नांवर संवदेनशील असलेल्या मुस्लिमांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्याचा मार्ग जीनांनी निवडला. यासाठी अनेक मुद्दे निवडले. जसे 'वंदे मातरम्' गीताचे स्वरूप मूर्तिपूजक असल्यामुळे मुस्लिमांचा त्याला विरोध, मुसलमानांवर उर्दूऐवजी संस्कृतप्रचुर हिंदीच्या वापराची सक्ती, वर्धा शिक्षण योजनेला म्हणजेच काँग्रेसने तयार केलेल्या 'नई तालीम' योजनेला विरोध इत्यादी मुद्द्यांचा वापर जीनांनी केला; तसेच काँग्रेसच्या राजवटीत विविध प्रांतांत मुस्लिमांवर अत्याचार होत असल्याचा आरोप जीनांनी केला. यासाठी त्यांनी चौकशी समिती नेमून तिचा अहवाल प्रसिद्ध केला. यांपैकी पीरपूर अहवाल एक होता. काँग्रेसने याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडून चौकशीची तयारी दाखविली होती. काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे व तिच्या नेतृत्वाखाली मुस्लिमांचे जीवन, धर्म व संस्कृती सुरक्षित नाही असा आरोप जीनांनी सातत्याने केला आणि मुस्लीम लीग हीच मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था, असा दावा तितक्याच आवेशाने वारंवार केला.

जीनांच्या राजकीय जीवनाची सुरुवात राष्ट्रवादाने झाली होती. इ. स. १९०६ च्या सुमारास त्यांनी मुस्लिमांच्या विभक्त मतदारसंघाला विरोध केला होता; नंतर १९१३ मध्ये ते मुस्लीम लीगमध्ये आले. इ. स. १९१६ मध्ये

टिळकांच्या सहकार्याने मुस्लीम लीग आणि काँग्रेस यांना एकत्र आणून स्वराज्यप्राप्तीकरिता लढा देण्यासाठी लखनौ करार घडवून आणला. इ. स. १९३० नंतर आणि विशेषत: १९३६ नंतर जीनांनी मुस्लीम जातीयवादाचा आधार घेतला. मुस्लिमांनी संघटित झाले पाहिजे अन्यथा त्यांच्यावर काँग्रेसचे 'हिंदू राज्य' प्रस्थापित होईल असा इशारा त्यांनी दिला.

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर इंग्लंडने भारतीयांना विश्वासात न घेता भारत या युद्धात इंग्लंडच्या बाजूने उतरत असल्याची घोषणा केली. काँग्रेसच्या नेतृत्वाने ब्रिटिश शासनाने प्रथम आपले युद्धहेतू जाहीर करावेत व युद्धानंतर भारताच्या स्वराज्याच्या घोषणेची हमी द्यावी अशी मागणी केली. शासनाने असे करण्यास नकार दिल्यामुळे विविध प्रांतांतील काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी १९३९ च्या शेवटी राजीनामे दिले. मुस्लीम लीगने याबद्दल आनंद व्यक्त केला आणि त्या प्रांतांतील मुस्लिमांची 'काँग्रेसच्या हिंदू राज्या'पासून सुटका झाल्याबद्दल २२ डिसेंबर, १९३९ हा 'मुक्ती दिन' म्हणून साजरा करण्याचे आवाहन आपल्या अनुयायांना केले.

**ब्रिटिश शासन व मुस्लीम लीग जवळ आले**

शासनाच्या युद्धप्रयत्नांत मुस्लीम लीगने ब्रिटिश शासनाला संपूर्ण सहकार्याची तयारी दाखविली. युद्धकाळात ब्रिटिश शासनाला भारतीयांचे सहकार्य हवे हेते. ते देण्याची तयारी मुस्लीम लीगने दाखविल्यामुळे शासनाने मुस्लीम लीगकडून सहकार्य घेतले. याउलट युद्धकाळात वैयक्तिक सत्याग्रह करणाऱ्या काँग्रेसबद्दल ब्रिटिश शासनाला नाराजी होती. ब्रिटिशांबद्दल मुस्लीम लीगने दाखविलेल्या निष्ठेच्या व केलेल्या सहकार्याच्या बदल्यात ब्रिटिश शासनाने मुस्लिमांच्या हिताचे रक्षण भावी घटनेत केले जाईल असे आश्वासन दिले. ऑक्टोबर, १९३९ मध्ये इंग्लंडच्या राजाच्या वतीने जे निवेदन प्रसिद्ध केले त्यात वरील आश्वासनाचा उल्लेख होता. मुस्लिमांच्या मताची दखल भावी घटनेत घेण्याचे आश्वासन मुस्लिमांना दिले.

**पाकिस्तानचा ठराव (लाहोर, १९४०)**

मुस्लिमांसाठी वेगळ्या, स्वतंत्र राज्याच्या (मुस्लीम होमलॅन्ड) विचाराने मुस्लिमांमध्ये मूळ धरले होते. इकबाल, रहमत अली यांसारख्यांनी हा विचार मांडला होता. या राज्याचे नेमके स्वरूप कोणी स्पष्ट केले नसले तरी, तशा राज्याची मागणी पुढे ठेवून त्याभोवती मुस्लिमांना केंद्रित केले गेले. मार्च, १९४० मध्ये लाहोर येथे भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात मुस्लिमांसाठी वेगळ्या राज्याचा ठराव मांडण्यात आला आणि तो संमत करण्यात आला. हाच ठराव 'लाहोर ठराव' म्हणून ओळखला जातो. या ठरावात असे नमूद करण्यात आले की, वायव्येकडील आणि पूर्वेकडील मुस्लिमांची बहुसंख्या असलेल्या सलग विभागांची, आवश्यक ती प्रादेशिक पुनर्रचना करून ते स्वतंत्र करावेत आणि या विभागांचे स्वतंत्र आणि स्वायत्त राज्य बनवावे. याशिवाय दुसरी कोणतीही उपाययोजना मुस्लिमांना मान्य होणार नाही असे स्पष्ट करण्यात आले. मुस्लीम लीगच्या पाकिस्तानच्या ठरावामुळे मुस्लिम जनतेची राजकीय मन:स्थिती आणि भारताचे राजकारण याला वेगळे वळण मिळाले. ठरावात प्रत्यक्ष पाकिस्तान हा शब्द वापरला नसला तरी मुस्लीम बहुसंख्येच्या प्रदेशाचे स्वायत्त राज्य म्हणजेच पाकिस्तान हे मुस्लीम लीगच्या नेत्यांना अभिप्रेत होते.

**जीनांच्या द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त**

पाकिस्तानच्या ठरावावर बोलताना जीनांनी आपला द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त मांडला. ते म्हणाले की, 'भारतात हिंदू व मुस्लीम ही दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत. हे वास्तव ध्यानात घेऊनच नवी घटना तयार करण्यात यावी.' जीनांनी लाहोर ठरावात संकल्पित स्वतंत्र मुस्लीम राज्यात कोणते प्रांत असावेत याचा स्पष्ट उल्लेख केला नव्हता. याचे कारण असे होते की, जीना याबद्दल आताच आपली मागणी स्पष्ट करून स्वत:ला मर्यादित करून घेऊ इच्छित नव्हते. या ठरावाचे महत्त्व असे होते की, स्वतंत्र मुस्लीम राज्याची मागणी करून जीनांनी मुस्लिमांसमोर एक ध्येय

ठेवले, ज्याच्या प्राप्तीसाठी सर्व प्रयत्न त्या दिशेने केंद्रित केले गेले आणि जीनांना बहुसंख्य मुस्लिमांना राष्ट्रीय चळवळीपासून दूर ठेवण्यात यश मिळाले. जोपर्यंत मुस्लिमांची स्वतंत्र राज्याची मागणी मान्य होत नव्हती तोपर्यंत भारताच्या स्वातंत्र्यलढ्याशी त्यांना देणे-घेणे नव्हते.

मुस्लीम लीगच्या स्वतंत्र मुस्लीम राज्याच्या मागणीला लॉर्ड लिनलिथगो (व्हाइसरॉय) यांनी अप्रत्यक्ष पाठिंबा दिला. ऑगस्ट, १९४० मध्ये ब्रिटिश शासनाच्या वतीने प्रस्तुत केलेल्या निवेदनात त्यांनी हे स्पष्ट केले की, 'बऱ्याच मोठ्या जनमताचा (म्हणजे मुस्लिमांचा) विरोध असेल ती योजना मात्र अमलात येणार नाही. युद्धानंतर घटना तयार करण्यासाठी प्रातिनिधिक भारतीय नागरिकांची एक समिती नेमण्याचा सरकार प्रयत्न करील' याचाच अर्थ व्हाइसरॉय मुस्लिमांना अमान्य असलेली घटना त्यांच्यावर लादली जाणार नाही याचे आश्वासन त्यांना देत होते. मुस्लीम लीगने या निवेदनाचे स्वागत केले.

### क्रिप्स मिशन व मुस्लीम लीग

दुसऱ्या महायुद्धात अडकलेल्या इंग्लंडला भारतीयांचे युद्धप्रयत्नांत सहकार्य हवे होते; तसेच पूर्वेकडे जपान विजयी आगेकूच करीत होता. जपानी सैन्यासोबत आझाद हिंद सेना होती. अशा परिस्थितीत भारतीयांचा इंग्लंडला पाठिंबा मिळविण्यासाठी ब्रिटिश शासनाने क्रिप्स यांना एक योजना देऊन भारतात पाठविले. भारतासाठी राजकीय योजना घेऊन क्रिप्स मार्च, १९४२ मध्ये भारतात आले. या योजनेचे स्वरूप असे होते की, युद्धसमाप्तीनंतर घटना समिती, घटना तयार करण्यासाठी स्थापना केली जाईल. या घटना समितीवर विविध पक्षांचे व संस्थानांचे प्रतिनिधी असतील. मात्र एखाद्या प्रांताला किंवा प्रांतांना ही घटना मान्य नसेल तर त्यांना स्वतःची घटना तयार करण्याचे स्वातंत्र्य असेल आणि त्या प्रांतांना भारतीय राज्यांसारखाच दर्जा मिळेल. युद्धानंतर भारताला वसाहतीचा दर्जा दिला जाईल. काँग्रेसने ही योजना फेटाळून लावली; कारण काँग्रेसच्या मते यात भारताच्या विभाजनाची बीजे होती. मुस्लीम लीगनेही या योजनेला नकार दिला. वस्तुतः प्रांतांना फुटून निघण्याचा अधिकार क्रिप्स योजनेने दिला होता. या योजनेत ''हिंदू व मुसलमान यांची स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्याची तरतूद न करता प्रथम एक राष्ट्र निर्माण करून मागाहून एकापेक्षा अधिक राष्ट्रे स्थापन करण्याची तरतूद या योजनेत आहे. लीगने फाळणीखेरीज तरणोपाय नाही असा निर्णय घेतलेला असल्याने एक राष्ट्र तयार करण्यासाठी स्थापन व्हायच्या घटना समितीत लीग भाग घेऊ शकत नाही.'' परंतु जीनांना मुस्लीम बहुसंख्येच्या प्रांतांचे एकत्रित पाकिस्तान हवे होते. त्यांना अपेक्षित स्वतंत्र मुस्लीम राज्य यात नसल्यामुळे जीनांनी आणि त्यांच्या मुस्लीम लीगने क्रिप्स यांची योजना अमान्य केली.

### छोडो भारत चळवळ आणि मुस्लीम लीग

ऑगस्ट, १९४२ मध्ये काँग्रेसने ब्रिटिशांनी भारत सोडून जावे अशी मागणी करणारी 'छोडो भारत' चळवळ सुरू केली. या चळवळीला मुस्लीम लीगचा विरोध होता; यामुळे जीनांनी मुस्लिमांना या चळवळीपासून दूर राहण्याचा इशारा दिला. मुस्लीम लीगने यासंबंधी पास केलेल्या आपल्या ठरावात असे नमूद केले की, 'काँग्रेसचा हेतू ब्रिटिश शासनावर दडपण आणून सत्ता हस्तगत करण्याचा व 'हिंदू राज्य' स्थापन करण्याचा आहे. याला मुस्लिमांनी बळी न पडता त्यांनी या चळवळीपासून दूर राहावे.' मुस्लीम लीगने हे स्पष्ट केले की, त्यांच्या पाकिस्तानच्या योजनेला ब्रिटिश शासनाने पाठिंबा दिल्यास ते या चळवळीविरुद्ध शासनाला मदत करतील. सरकारवर दबाव आणून मुस्लिमांना काँग्रेससमोर शरणागती स्वीकारण्यास भाग पाडावे असा 'चले जाव' चळवळीमागचा काँग्रेसचा उद्देश आहे. त्याचबरोबर ब्रिटिश सरकारने मुसलमान व इतर अल्पसंख्य जाती यांना दिलेली वचने पाळू नयेत हा या चळवळीमागे (छोडो भारत) उद्देश आहे, असे जीनांनी स्पष्ट केले. मुस्लीम लीगच्या पाकिस्तान योजनेला सुरुंग लावण्यासाठी 'चले जाव' चळवळ आहे असे जीनांचे म्हणणे होते.

## राजाजी योजना व मुस्लीम लीग (१९४४)

काँग्रेसचे एक नेते चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी १९४२ मध्ये एक प्रस्ताव मांडून त्यात भारतातील मुस्लिमांना एक वेगळे राज्य देण्यात यावे असे म्हटले होते. हा प्रस्ताव काँग्रेसने फेटाळला होता आणि भारताच्या फाळणीला विरोध केला होता. पुन्हा एकदा १९४४ मध्ये यासंबंधाने एक योजना राजाजींनी जीनांच्या समोर मांडली. या योजनेला गांधीजींचा पाठिंबा आहे असे राजाजींनी जीनांना कळविले होते. या योजनेत अशी तरतूद होती की, भारताच्या वायव्येला आणि पूर्वेला मुस्लीम बहुसंख्येचे प्रदेश कोणते आहेत हे ठरविण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी आणि त्या भागातील जनतेला भारतात राहावयाचे आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी त्या प्रदेशात सार्वमत घेण्यात यावे. मात्र ही योजना भारताला इंग्लंडकडून पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यावरच अमलात येईल.

जीनांनी राजाजींची योजना फेटाळून लावली. जीनांच्या शब्दांत राजाजी मुस्लीम लीगला 'छिन्न-विछिन्न, पांगळे, कसरीने खाल्लेले' पाकिस्तान देऊ इच्छित होते. हे मुस्लीम लीगला अमान्य होते. पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, बंगाल आणि आसाम हे प्रांत जीनांना त्यांच्या कल्पनेतील पाकिस्तानमध्ये पूर्णपणे हवे होते. या प्रांतांपेक्षा काहीही कमी स्वीकारण्याची जीनांची तयारी नव्हती. जीनांनी या वेळी हे स्पष्ट केले की, सार्वमत घेतल्यास ते फक्त मुस्लिमांपुरतेच मर्यादित असेल. मात्र राजाजींनी पाकिस्तानच्या कल्पनेला मान्यता दिली होती याचा जीनांना आनंद झाला. राजाजींच्या योजनेवर हिंदू महासभा व शीख संघटनांनी कडक टीका केली.

## गांधी-जीना बोलणी (१९४४)

राजाजींची योजना जीनांनी फेटाळल्यावर गांधीजींनी जीनांशी बोलणी करण्याची इच्छा व्यक्त केली; परंतु त्यांच्यातील बोलणी असफल ठरली. देशातील जातीयतेच्या प्रश्नावर व अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधित्वाच्या प्रश्नावर तोडगा निघू शकला नाही (या बोलण्याचा तपशील मागच्या प्रकरणात दिला आहे). गांधीजींनी मुस्लिमांचा प्रवक्ता या नात्याने जीनांशी बोलणी केल्यामुळे जीनांची राजकीय प्रतिष्ठा वाढली.

काँग्रेसचे एक नेते भुलाभाई देसाई आणि मुस्लीम लीगचे नेते लियाकत अली यांच्यात पाकिस्तानच्या मागणीवर बोलणी झाली. यात असे ठरले की, काँग्रेस व मुस्लीम लीग यांनी हंगामी सरकार स्थापन करावे. या व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात व्हाइसरॉय आणि सरसेनापती सोडून बाकी सर्व सदस्य भारतीय असावेत. हंगामी सरकारमध्ये काँग्रेस व मुस्लीम लीगला समान वाटा असेल. जीनांनी असा पवित्रा घेतला की, लियाकत अलींना असा करार करण्याचे अधिकार दिलेले नाहीत आणि त्यांना स्वतःला कराराबद्दल काही माहिती नाही; त्यामुळे लियाकत अलींनीही माघार घेतली. अशा रीतीने ही बोलणी अयशस्वी ठरली.

## सिमला परिषद (१९४५)

व्हायसरॉय वॅव्हेल यांनी इंग्लंडमधील ब्रिटिश शासकांनी दिलेल्या योजनेवर बोलणी करण्यासाठी सिमला येथे काँग्रेस व मुस्लीम लीग व इतर प्रमुख पक्षांच्या नेत्यांना बोलाविले. वॅव्हेल योजनेवरील ही परिषद सर्वमान्य तोडगा काढण्यात अयशस्वी ठरली. या योजनेत व्हाइसरॉयची अशी तरतूद होती की, कार्यकारी मंडळात व्हाइसरॉय व सरसेनापती वगळता इतर सर्व सभासद भारतीय असतील. परराष्ट्र व्यवहार खाते भारतीयांच्या हाती सोपविण्याचा प्रस्तावही या योजनेत होता. या कार्यकारी मंडळात हिंदू आणि मुस्लिमांना समान प्रतिनिधित्व देण्याचा प्रस्ताव होता. हा प्रस्ताव जीनांना मान्य होता, परंतु एवढ्यावर समाधान न मानता त्यांनी अशी मागणी केली की, कार्यकारी मंडळातील मुस्लीम सदस्य हे मुस्लीम लीगचेच असले पाहिजेत. ही अट काँग्रेसला मान्य नव्हती; त्यामुळे सिमला परिषद अयशस्वी ठरली.

या परिषदेतून हे स्पष्ट झाले की, लॉर्ड वॅव्हेल यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या संदर्भात होणाऱ्या काँग्रेस व मुस्लीम लीग यांच्या तडजोडीबाबत जीना यांच्या हाती नकाराधिकार सोपविला आहे. या परिषदेने हे सिद्ध केले की, ब्रिटिश

भारतातील सत्तांतराच्याबाबत बोलणी करताना मुस्लिमांची प्रातिनिधिक संघटना म्हणून मुस्लीम लीग पक्षाच्या नेतृत्वाशीच बोलणी करणार; त्यामुळे जीनांचे सामर्थ्य वाढले. जे मुस्लीम नेते मुस्लीम लीग पक्षाबाहेर होते त्यांना मुस्लीम लीगचे नेतृत्व मान्य करणे भाग पडले. अशा रीतीने मुस्लीम लीगचे सामर्थ्य वाढले.

**सार्वत्रिक निवडणुका व मुस्लीम लीग**

इ. स. १९४५ मध्ये इंग्लंडमध्ये निवडणुकीत मजूर पक्ष सत्तेवर आला. इंग्लंडमधील नव्या शासनाने भारतात निवडणुका घेण्याचे ठरविले. इ. स. १९४५ च्या अखेरीस केंद्रीय कायदेमंडळासाठीच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. सर्वसाधारण मतदारसंघांत काँग्रेसला तर मुस्लिमांसाठी राखीव जागांवर मुस्लीम लीगला दणदणीत यश मिळाले. केंद्रीय विधिमंडळात एकूण १०२ निर्वाचित सदस्यांपैकी काँग्रेसचे ५७, मुस्लीम लीगचे ३०, स्वतंत्र ५, अकाली शीख २, युरोपीय ८ अशी विविध पक्षांची स्थिती होती. प्रांतिक स्तरावर आसाम, वायव्य सरहद्द प्रांत येथे इतरांच्या सहकार्याने काँग्रेसची मंत्रिमंडळे सत्तेवर आली. मुंबई, मद्रास, संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा आणि मध्य प्रांत या प्रांतांत काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळून त्या पक्षाची मंत्रिमंडळे सत्तेवर आली. बंगाल व सिंध प्रांतांत मुस्लीम लीगची मंत्रिमंडळे सत्तेवर आली. काँग्रेस व मुस्लीम लीग हे दोन प्रमुख पक्ष भारतीय राजकारणात आहेत हे स्पष्ट झाले. या निवडणुकीत मुस्लीम लीगने मुस्लिमांच्या धार्मिक भावनांना आवाहन केले होते. 'मुस्लीम लीगसाठी व पाकिस्तानसाठी मत म्हणजे इस्लामला मत' असा प्रचार केला गेला होता; तरीही मुस्लीम लीगच्या यशाला मर्यादा होत्या. ज्या भागात मुस्लीम लीग पाकिस्तान निर्माण करू पाहात होती, तिथे लीगला पूर्ण यश मिळाले नव्हते. पंजाबमध्ये युनियनिस्ट पक्षाचे खिज्र हयातखान यांच्या नेतृत्वाखाली अकाली शीख व काँग्रेस यांचे संयुक्त सरकार सत्तेवर आले होते.

**कॅबिनेट मिशन योजना व मुस्लीम लीग**

भारतातील राजकीय कोंडी फोडण्यासाठी इंग्लंडमधील शासनाने आपल्या मंत्रिमंडळातील तीन सदस्यांचे एक शिष्टमंडळ भारतात १९४६ मध्ये पाठविले (या योजनेचा तपशील मागच्या प्रकरणात दिला आहे). भारतीय नेत्यांशी कॅबिनेट मिशनने चर्चा केली; परंतु त्यातून सर्वमान्य तोडगा निघू न शकल्यामुळे मिशनने आपली योजना १६ मे, १९४६ रोजी घोषित केली.

या योजनेनुसार भारतातील ब्रिटिशशासित प्रांत आणि भारतीय संस्थाने यांचे मिळून भारताचे एकसंध केंद्रीय सरकार असावे (Union of India). त्याकडे परराष्ट्र संबंध, संरक्षण, दळणवळण ही खाती असावीत. या केंद्र सरकारला एक केंद्रीय कार्यकारी मंडळ आणि विधिमंडळ असावे. केंद्र सरकारकडे असलेल्या विषयांव्यतिरिक्त इतर सर्व विषय व अधिकार प्रांतांना असावेत.

प्रांताचे अ, ब आणि क असे तीन गट बनवावेत. 'क' गटात बंगाल व आसाम या प्रांतांचा समावेश असावा. पंजाब, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांत यांचा 'ब' गटात अंतर्भाव असावा अणि 'अ' गटात उरलेल्या प्रांतांना समाविष्ट करण्यात आले होते. त्या गटांनी आपापल्या प्रांतांची घटना तयार करावी. या तीन गटांच्या प्रतिनिधींनी नंतर एकत्र येऊन केंद्र सरकारसाठी घटना तयार करावी. कोणत्याही प्रांताला त्यांच्या प्रांतिक गटातून बाहेर पडण्याची इच्छा असल्यास आणि तसा निर्णय त्या प्रांताच्या विधिमंडळाने घेतल्यास तसे करण्याचा अधिकार त्या प्रांताला राहील. प्रांतांच्या तीन गटांतून मिळून २९२ प्रतिनिधी निवडले जायचे होते तर संस्थानांच्या वाट्याला ९३ प्रतिनिधी आले होते.

जीनांनी या योजनेला पहिल्यांदा संमती दिली. त्यात त्यांना अनुकूल असे पुढील मुद्दे होते– (१) दुबळे केंद्र सरकार, (२) पंजाब, बंगाल, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध अशा मुस्लीम बहुसंख्येच्या प्रदेशांचे वेगवेगळे गट, (३) त्यांना आपापली घटना तयार करण्याचा अधिकार, (४) उर्वरित अधिकार प्रांतांच्या गटांना मिळणार. यामुळे

पाकिस्तानची कल्पना त्यात बऱ्याच अंशी साकार होत होती. आपले उद्दिष्ट साध्य होत असल्याने मुस्लीम लीगने मिशनची योजना मान्य केली.

या योजनेत प्रांतांचे जे तीन गट तयार करण्यात आले होते, ते काँग्रेसला मान्य नव्हते. जवाहरलाल नेहरू यांनी प्रांतांचे गट सक्तीचे नाहीत व प्रांतांना त्या-त्या गटात जाण्याची सक्ती करता येणार नाही अशी भूमिका घेतली. जीनांना हे मान्य नव्हते, कारण त्यात त्यांचा अपेक्षाभंग होत होता. मुस्लीम लीगने २९ जुलै, १९४६ रोजी कॅबिनेट मिशन योजनेला दिलेला पाठिंबा काढून घेतला आणि पाकिस्तानच्या प्राप्तीसाठी घटनात्मक मार्ग सोडून 'प्रत्यक्ष कृती'चा म्हणजेच हिंसाचाराचा मार्ग स्वीकारत असल्याची घोषणा केली.

जीनांचा अपेक्षाभंग आणखी काही कारणांमुळे झाला व त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष कृतीचा आधार घेतला. कॅबिनेट मिशन योजनेप्रमाणे जुलै, १९४६ च्या अखेरीस घटना समितीसाठी निवडणुका झाल्या. यात सर्वसाधारण २१० जागांपैकी काँग्रेसने १९९ जागा जिंकल्या. चीफ कमिशनरांच्या प्रांतांसाठी असलेल्या ४ जागांपैकी ३ जागा काँग्रेसने जिंकल्या. मुस्लीम लीगने मुस्लिमांसाठी असलेल्या राखीव ७८ जागांपैकी ७३ जागा जिंकल्या. घटना समितीत काँग्रेसचे बहुमत राहणार हे लक्षात येताच जीना अस्वस्थ झाले. तसेचं काँग्रेस अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी असे वक्तव्य केले की, केंद्र सरकार हे प्रबळ असले पाहिजे आणि घटना समितीत कोणती भूमिका घ्यावी याबद्दल काँग्रेस पक्ष बांधलेला नाही असेही स्पष्ट केले. मात्र हंगामी सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला.

**प्रत्यक्ष कृती दिन**

२९ जुलै रोजी भरलेल्या मुस्लीम लीगच्या कार्यकारिणीच्या बैठकीत १६ ऑगस्ट, १९४६ हा दिवस 'प्रत्यक्ष कृती दिन' म्हणून पाळावयाचे ठरले होते. त्याप्रमाणे त्या दिवशी मुस्लीम लीगच्या अनुयायांनी हिंसाचार केला. मुस्लीम बहुसंख्येच्या प्रदेशांत हिंदूंवर अत्याचार करण्यात आले. त्यांच्यावर हल्ले करण्यात आले. मुस्लीम लीगची सत्ता असलेल्या बंगालच्या राजधानीत म्हणजे कोलकात्यात मोठे हत्याकांड घडून आले. याला मुस्लीम लीगचे मुख्यमंत्री सुऱ्हावर्दी यांचा पाठिंबा होता. त्याशिवाय नौखाली, टिप्पेरी इत्यादी भागांतही हिंसाचार झाला. अनेक हिंदू मारले गेले, अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले, अनेक स्त्रियांची विटंबना झाली आणि हिंदूंची मालमत्ताही नष्ट केली गेली. आपल्या मागण्या मान्य न झाल्यास आपण कोणत्या थराला जाऊ शकतो, हे जीनांनी दाखवून दिले. महात्मा गांधी हा हिंसाचार थोपविण्यासाठी बंगालमध्ये गेले.

**अंतरिम किंवा हंगामी सरकार व मुस्लीम लीग**

कॅबिनेट मिशन योजनेनुसार नवी राज्यघटना अमलात येईपर्यंत हंगामी सरकारने कारभार पाहावयाचा होता. त्यानुसार हंगामी सरकार स्थापन झाले. प्रथम मुस्लीम लीगने हंगामी सरकार स्थापन होण्यास नकार दिला होता. व्हाइसरॉय वॅव्हेल यांच्या प्रयत्नांमुळे मुस्लीम लीगने हंगामी सरकारमध्ये प्रवेश केला. त्यांना हंगामी सरकारमध्ये पाच जागा देण्यात आल्या; परंतु हंगामी सरकारमध्ये मुस्लीम लीगने पाकिस्तानचे ध्येय साध्य करण्यासाठी आणि सामान्य प्रशासन ठप्प करण्यासाठी प्रवेश केला होता. त्यांनी काँग्रेस गटाचे आणि जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व मान्य केले नाही, जे हंगामी सरकारचे प्रमुख होते. मुस्लीम लीगचा गट आणि काँग्रेसचा गट असे दोन वेगवेगळे गट हंगामी सरकारमध्ये राहिले. लियाकत अलीखान यांच्याकडे अर्थखाते असल्यामुळे त्यांना अर्थ विधेयकाविषयी अडवणूक करणे सोपे गेले. मुस्लीम लीगचे सदस्य घटना समितीच्या बैठकीलाही अनुपस्थित राहिले. काँग्रेस व मुस्लीम लीगच्या सदस्यांना समझोता करण्यासाठी लंडनला बोलाविण्यात आले; पण त्यात तोडगा निघू शकला नाही. हंगामी सरकार चालणे अशक्य झाले होते. यातून मार्ग काढण्यासाठी ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनी एक घोषणा केली.